**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७०३/२०२४**
**सरकार/रोशन**
**<u>नि.क्र.२४</u>**

**<u>अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.४ याची साक्ष</u>**

**<u>मी शपथेवर सांगतो कि,</u>**
**नाव – शेषराव गुलाबराव भलावी**
**वय – ४३ वर्ष**
**धंदा – शेती,**
**राहणार – साखरखेडा, ता. नरखेड जि. नागपूर**

**<u>सरतपास विशेष सरकारी अभियोक्ता कु. एस.एस. गंगावणे यांच्या मार्फत.</u>**

**१.** फिर्यादी ही माझी पत्नी आहे. मी आरोपीला ओळखतो. घटना हि दि. २७.०६.२०२४ रोजी दुपारी १२.०० च्या दरम्यान माझ्या घरासमोर घडली होती.

२. घटनेच्यावेळी मी माझ्या शेतात गेलो असतांना मला माझ्या पत्नीचा फोन आला की, माझ्या घरी उत्कर्ष गटाची मिटींग संपल्यानंतर माझी पत्नी घरा बाहेर आली होती. त्यावेळी आरोपीने माझ्या पत्नीला, 'भोसडीचे तू रंडी आहे' अशा शब्दात शिवीगाळ करुन तिच्या छातीवर लाथ मारली. त्यामुळे ती खाली पडली होती तसेच तिला जिवे मारण्याची धमकी सुध्दा दिली होती. त्यानंतर मी तत्काळ माझ्या घरी आलो. मी व माझी पत्नी जलालखेडा पोलिस स्टेशनला गेलो व माझ्या पत्तीने आरोपीविरुध्द फिर्याद दिली. त्यानंतर पोलिस माझ्या पत्नीला वैद्यकीय तपासणीसाठी प्राथमिक उपचार केंद्र जलालखेडा येथे घेउन गेले होते. त्यानंतर दोन दिवसांनी पोलिस आमच्याकडे चौकशी करिता आले होते व त्यावेळी मी पोलिसांना घटनेबाबत बयान दिले होते. न्यायालयात हजर असलेल्या आरोपीकडे बघून साक्षीदाराने त्याला ओळखले.

**<u>सरतपास संपला</u>**

**उलटतपास आरोपीचे अधिवक्ता श्री.एम.आर.चरडे मार्फत.**

३. हे म्हणने खरे आहे की, घटना प्रत्यक्ष माझ्यासमक्ष घडली नव्हती. हे म्हणने खरे नाही की, मी माझ्या सरतपासात सांगितलेला मजकूर की, घटनेच्यावेळी माझ्या पत्नीने मला फोनवर सांगितले की, आपल्या घरची उत्कर्ष गटाची मिटींग संपल्यावर ती बाहेर आली असता, आरोपीने तिला ‘भोसडीचे तू रंडी आहे, अशा शब्दात शिवीगाळ करुन तिच्या छातीवर लाथ मारली. त्यामुळे ती खाली पडली होती तसेच तिला जिवे मारण्याची धमकी सुध्दा दिली होती हे मी खोटे सांगत आहे. उत्कर्ष गटाची प्रमूख माझी पत्नी असून सदर गटाची मिटींग माझ्या घरीच होते. आरोपी व आमच्या घराच्यामध्ये १० फुटाचा रोड आहे. मला माझ्या पत्नीने घटनेच्यावेळी इतर कोण हजर होते हे सांगितले नव्हते. हे म्हणने खरे आहे की, उत्कर्ष गटामधून आरोपीच्या पत्नीने कर्ज घेतले आहे. हे म्हणने खरे आहे की, उत्कर्ष गटाच्या मिटींगमध्ये आरोपीची पत्नी देखील हजर राहत असते. हे म्हणने खरे आहे की, गटाचे कर्ज फेडल्यानंतर जास्त रक्कम दिल्या जात असते.

**प्रश्न:–** तूमच्यामध्ये व आरोपीमध्ये घटनेपूर्वी वादविवाद होता का ?

**उत्तर:–** आरोपी घटनेच्या दोन ते तीन वर्षाआधी पासून दारु पिउन आम्हाला शिवीगाळ करतो.

४. हे म्हणने खरे आहे की, त्यामुळे आमचे व आरोपीचे बोलचाल नाही. हे म्हणने खरे आहे की, त्यामुळे आमचे आरोपीशी संबंध चांगले नव्हते. हे म्हणने खरे नाही की, आरोपीच्या पत्नीला गटाचे वाढीव कर्ज न मिळाले पाहिजे म्हणून माझ्या पत्नीने त्याच्याविरुध्द खोटी तक्रार दिली.

५. मी पोलिसांना बयान देतेवेळी सांगितले होते की, पोलिस माझ्या पत्नीला वैद्यकीय उपचारासाठी घेउन प्राथमिक उपचार केंद्र जलालखेडा येथे घेउन गेले होते. सदरची बाब माझ्या बयानात का नमूद नाही याचे कारण मी सांगू शकत नाही.

६. हे म्हणने खरे आहे की, पोलिसांना आम्ही लिलाबाई चौधरी यांची नावे साक्षदार म्हणून सांगितली होती. हे म्हणने खरे नाही की, आमच्यामध्ये व आरोपीमध्ये बचत गटावरुन वाद आहे म्हणून मी आरोपीविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

फेरतपास काही नाही.

**श्रवणोत्तर स्विकृत** **समक्ष**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**
**दिनांक –१८.०२.२०२५**

**(पी.आर.पाटील)**
**प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,**
**नरखेड**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते कि पुराव्याच्या सदर पि.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा पुराव्याच्या मुळ प्रतीप्रमाणे बरोबर आहे.

**लघुलेखकाचे नाव**– पी.एच. शिरभाते (श्रेणी–३)